# **बृहन्मुंबई महानगरपालिका**

**विषय**:- मान. महानगरपालिका आयुक्त महोदय यांच्या आदेशान्वये एन विभागामध्ये प्रभाग निहाय Deep Cleanliness Drive उपक्रम राबविण्याकरीता सेक्शननिहाय मनुष्यबळ (श्रमदिन) उपलब्ध करुन देण्यासाठी सोडत पध्दतीने एन विभागातील स्थानिक संस्थांची नियुक्ती करण्याबाबत.

'एन' विभागामध्ये विषयांतर्गत कामाकरीता '**एन**' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा / श्रमदिनांचा पुरवठा करण्याकरीता प्रत्येक युनिट निहाय स्वतंत्र संस्थेची सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| युनिट क्र. | तपशील | निवड करावयाची संस्था |
|---|---|---|
| 1 | 123/124 | 01 |
| 2 | 125/133 | 01 |
| टिप:- विषयांकीत काम प्रभावीपणे नियमानुसार होणे अपेक्षीत आहे व नागरिकांच्या अरोग्याशी निगडीत असल्यामूळे अर्जदार संस्थेला मनपा मध्ये स्वच्छतेचे काम केलेचा अनुभव असणे बंधन कारक आहे. | | |

**अनामत रक्कम रु**.5,000/- **व छाननी शुल्क रु**.726/- + 18% **जीएस.टी** = **रु**.857/-

अर्जाचा नमुना '**एन**' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन)यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. '**बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त**' (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि.21.05.2025 ते दि.26.05.2025 पर्यंत (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 यावेळेत मिळु शकेल. अर्ज जमा करताना अर्जा सोबत दिलेल्या Annexure मध्ये नमूद सर्व कागदपत्रे, निविदा शुल्क रु.857/- व अनामत रक्कम रु.5,000/- भरल्याची पावती सादर करणे गरजेचे आहे. सोडतीचा दिनांक एन विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थेस कामाचे वाटप सहाय्यक अभियंता (घकव्य) एन अटी व शर्तीनुसार करतील. तसेच सदर कामाकरीता युनिटनिहाय एक स्वतंत्र संस्था प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येईल. सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थांचे काम समाधानकारक नसल्यास किंवा कामामध्ये त्रुटी आढळुन आल्यास म.न.पा.च्या प्रचलित पध्दतीनुसार प्रतिक्षा यादीतील संस्थेस सदर काम करण्यासापेक्ष देण्यात येईल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी '**एन**' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने '**एन**' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.26.05.2025 दुपारी 04.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त एन विभाग**